
गांधी



लेखिका: डेमी


महात्मा (महान आत्मा) म्हणून ओळखले जाणारे मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म 1869 साली भारतात झाला. भविष्यात ते जगातील सर्वात प्रभावी आणि आदरणीय राजकीय व सामाजिक नेते बनले.

गांधी एक ठाम आदर्शवादी आणि निर्भय विचारवंत होते. त्यांनी सामान्य लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी संघर्ष केला. ते समाजातील शोषित आणि उपेक्षित लोकांचा आवाज बनले. तिरस्काराला फक्त प्रेमानेच जिंकता येते, यावर त्यांची अढळ श्रद्धा होती. अहिंसेचा मार्ग अवलंबून सामाजिक आणि राजकीय बदल कऱण्याचे व्रत त्यांनी घेतले होते. भारताच्या पूर्वग्रहदूषित जातीव्यवस्थेत बदल घडवून आणण्यात तसेच भारताला जुलमी ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्य देण्यात त्यांनी महत्त्वाचा वाटा उचलला.

गांधी यांच्या अहिंसक मार्गाची शिकवण अनेकांना स्फूर्ती देऊन गेली. अमेरिकेत नागरी हक्कांचा लढा देणारे मार्टीन ल्यूथर किंग आणि आफ्रिकेत वर्णभेदविरोधी संघर्ष करणारे नेल्सन मंडेला हे यात प्रामुख्याने पुढे होते. जगभरात जिथे-जिथे अहिंसक मार्गाने चळवळी झाल्या, तेथील लोकांवर गांधींचा प्रभाव पडला.

डेमी या लेखिकेने ओघवत्या शब्दांतून आणि नितांत सुंदर चित्रांतून गांधी यांचे विचार सहजतेने या पुस्तकात मांडले आहेत. हे पुस्तक लिहून डेमी यांनी या महात्म्याला जणू श्रद्धांजलीच वाहिली आहे.





गांधींचे जग
(1869-1948)
ग्रेट ब्रिटन
GREAT BRITAIN
लंडन
London
पाकिस्तान
PAKISTAN
Allahabad
New Delhi
Amritsar
भारत
Porbandar
Dandi
INDIA
PAKISTAN
Gandhi's World
1869-1948
दक्षिण आफ्रिका
SOUTH AFRICA
केप टाऊन
Cape Town
Durban
डर्बन


“विवेकी व्यक्ती तोच असतो, जो सर्वांमध्ये
स्वतःला आणि स्वतःमध्ये सर्वांना बघतो.
ईश्वराप्रती अगाध प्रेमभावना असल्यामुळे
त्याच्या स्वार्थी इच्छा-आकांक्षा आणि वासना
संपून गेलेल्या असतात.”


–भगवद्गीता


गांधी



मराठी अनुवादः सुशील मेन्सन








मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी भारतातील पोरबंदर येथे झाला. त्यांचे वडील एका राजाच्या दरबारात प्रधानमंत्री होते. त्यांची आई धार्मिक वृत्तीची होती. आपल्या मुलांना तिने जैन धर्माची शिकवण दिली. बालपणापासून गांधींवर *कर्म* करण्याचे संस्कार झाले – आत्मशुद्धीसाठी प्रार्थना करा, नियम पाळा, प्रामाणिक व्हा, गरजेपुरतीच मालमत्ता बाळगा आणि कुणाचे नुकसान करू नका.


वयाच्या 13 व्या वर्षी, तत्कालिन जैन परंपरेनुसार, गांधींचे लग्न झाले. त्यांची 13 वर्षे वयाची सुंदर पत्नी, कस्तुरबा माकनजी, या फार संयमी, कणखर आणि धीट होत्या.






बालपणी गांधी खूप बुजरे आणि भित्रे होते. त्यांना भूत, साप आणि काळोख अशा गोष्टींचे खूप भय वाटत असे. त्यांना रात्री अंधारात झोप लागत नसे. त्यामुळे रात्री दिवे सुरू ठेवूनच ते झोपत असत. कस्तुरबाला पतीच्या या भित्र्या स्वभावाचे हसू येत असे.

गांधी स्वतःला इतर लोकांपेक्षा वेगळे समजत. ते अभ्यासात इतरांपेक्षा कच्चे होते. मोठ्या मुश्किलीने ते हायस्कूल उत्तीर्ण झाले. कॉलेजमध्ये ते काही विषयांमध्ये अनुत्तीर्ण झाले. 1888 साली काकांच्या आग्रहावरून, गांधी कुटुंबापासून दूर लंडनमध्ये कायद्याचा अभ्यास करण्यास गेले. या परक्या देशात त्यांना फार एकाकी वाटत असे. तेथील संस्कृतीशी जुळवून घेण्यासाठी ते इंग्रज लोकांसारखे राहू लागले. ते महागड्या घरात राहू लागले आणि महागडे कपडे घालू लागले. ते अचूक इंग्रजी बोलायला, व्हायोलिन वाजवायला शिकू लागले तसेच इंग्लिश नृत्यही शिकू लागले.






पण याने गांधींचे समाधान झाले नाही. जैन संस्कारांमुळे गांधींना आपले बाह्य वर्तन आणि आतील प्रतिमा यांच्यात तफावत जाणवू लागली. मग ते साधेसरळ जीवन जगू लागले. त्यांनी महागडे घर, कपडे वापरणे सोडून दिले. ते आपला स्वयंपाक स्वतःच बनवू लागले, बस न वापरता पायीच प्रवास करू लागले आणि लंडनमधील शाकाहारी सोसायटीचे सदस्य बनले. स्वावलंबी झाल्यामुळे त्यांना खूप आनंदी वाटू लागले. पण त्यांच्या स्वभावातील बुजरेपण अद्याप कायम होते.

अखेरीस, ते कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाले आणि लंडनला आल्यानंतर तीन वर्षांनी भारतात घरी परतण्यासाठी ते पुन्हा जहाजावर चढले.

घरी परतल्यावर गांधींना आपल्या आईचे निधन झाल्याची बातमी कळली. आयुष्यात यश मिळवण्यासाठी गांधी मुंबईत येऊन वकिली करू लागले. पण आपल्या बुजऱ्या स्वभावामुळे ते चारचौघांत बोलू शकत नसत. त्यामुळे त्यांना अपमानही सहन करावा लागे.

दक्षिण आफ्रिकेतील एका कायदा कंपनीत एका वकिलाची गरज आहे, हे गांधींच्या भावाला कळले. त्यामुळे 1893 साली गांधी आणि त्यांची पत्नी भारत सोडून तिथे निघाले. पुन्हा ते एका परक्या, अनोळखी देशात आले. तिथे त्यांना प्रथमच वर्णभेदाचा अनुभव आला. आपल्या त्वचेच्या रंगावरून त्यांना दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या लोकांकडून तिरस्कार आणि मार सहन करावा लागला. तेथील कायद्याचे कामही क्लिष्ट होते. पण काम सोडून देण्यापेक्षा, तिथून पळ काढण्यापेक्षा गांधींनी स्वत:मध्येच बदल करायचे ठरवले, जेणेकरून ते कोणत्याही आव्हानाचा सामना करू शकतील.





ठाम निर्धार आणि एकाग्रता या जोरावर गांधींनी त्यांचे ध्येय साध्य केले. त्यांना उमगले की वकिली करणे म्हणजे मनुष्याच्या अंतरंगातील चांगल्या बाजुचा शोध घेणे आणि त्याच्या हृदयात आपले स्थान निर्माण करणे.

मग ते प्रत्येक अडचणीला इतरांची सेवा करण्याची संधी मानू लागले. हेच त्यांच्या उर्वरित जीवनातील यशाचे सूत्र बनले.






हिवाळ्यातील एके दिवशी, गांधी वकिलिच्या कामासाठी दौऱ्यावर निघाले. ते रेल्वेच्या प्रथम वर्गाच्या डब्यातून प्रवास करत होते. एका गोऱ्या माणसाने यावर नाराजी व्यक्त करून गांधींना तिसऱ्या वर्गाच्या डब्यात बसण्यास सांगितले. गांधींनी नकार देताच रेल्वेच्या अधिकाऱ्याने गांधींना रेल्वेतून बाहेर काढले. त्या अंधाऱ्या रात्री, कडाक्याच्या थंडीत, गांधी यांना वर्णभेदाच्या वैचारिक आजाराची वेदना आणि गांभीर्य लक्षात आले.




या अनुभवानंतर गांधीं यांच्या मनात *सत्याग्रह* किंवा *प्रेमाचे बळ* या संकल्पनेचा जन्म झाला. ते लिहितात, “प्रेमाचे बळ हिंसेवर नेहमीच विजय मिळवते.” त्यांनी वर्णभेद विचारांचा नायनाट करण्याचा ठाम निश्चय केला, पण कुठलीही हिंसा न करता तसेच हिंसक गोष्टींना मदत न करता. त्यांनी स्वर्गातील शांती पृथ्वीवर आणण्याचे व्रत घेतले.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस, दक्षिण आफ्रिकेवर डच लोकांची सत्ता होती. 22 ऑगस्ट 1906 रोजी डच सरकारने *काळा कायदा* लागू केला. या कायद्यान्वये, कृष्णवर्णीय आणि भारतीय लोकांचे नागरी हक्क हिरावून घेण्यात आले. या विरोधात, गांधींनी आपला पहिली अंहिसक जनचळवळ सुरू केली. या असहकार चळवळीत पाचशेपेक्षा जास्त लोक सहभागी झाले.









गांधी आणि त्यांचे अनुयायी यांनी कृष्णवर्णीय आणि भारतीय लोकांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. ते स्त्रियांच्या हक्कांसाठीदेखील लढले. गांधींनी लोकांना विनामूल्य कायदेशीर सल्ले दिले आणि जे लोक वाईट परिस्थितीत होते त्यांना मदत केली. प्लेगच्या साथीत, वाळीत टाकलेल्या आजारी रुग्णांची त्यांनी सेवा केली. त्यांनी कुष्ठरोग्यांच्या जखमांवर मलमपट्टी केली आणि मरणप्राय अवस्थेतील लोकांचे सांत्वन केले. गांधी म्हणत, “हे सर्व लोक माझे बांधव आहेत, “त्यांचे दुःख ते माझे दुःख! सारं जग माझं कुटुंबच आहे.”

गांधी यांची भारतीय धर्मग्रंथ भगवद्गीतावर अपार श्रद्धा होती. ते दिवसभरात अनेकदा ध्यान करत. याद्वारे आपल्याला इतरांवर प्रेम करता येईल आणि आपल्या मनातील इच्छा, स्वार्थ यांचा त्याग करता येईल, असे त्यांना वाटे. क्रोध आपल्या निर्णय क्षमतेवर प्रभाव टाकत असल्याने त्यांनी क्रोध भावनेपासून दूर राहाण्याचा प्रयत्न केला. प्रेमाच्या बळावर श्रद्धा असल्यामुळे आणि प्रत्येकाला आपल्या कुटुंबाचा सदस्य मानल्यामुळे गांधी यांच्या स्वभावातील बुजरेपण आणि भय नाहिसे झाले.






गांधी आणि त्यांचे अनुयायी यांनी चांगल्या आणि वाईट या दोन्ही गोष्टींचा स्वीकार केला. त्यांनी सर्व आव्हानांना विनम्रतेने आणि शांततेने तोंड दिले आणि जगभरात ऐक्य साधण्याचा प्रयत्न केला.




1915 साली गांधी आपली पत्नी आणि चार मुलांसमवेत भारतात परतले. लवकरच त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी संघर्ष सुरू केला.

त्यांना भारतातील वंशपरंपरागत आणि उच्चनीचता पाळणाऱ्या जातीव्यवस्थेचे उच्चाटन करावेसे वाटत होते. या व्यवस्थेत धार्मिक कर्म करणारे ब्राम्हण हे समाजाच्या अग्रस्थानी होते. त्याखालोखाल क्षत्रिय राजे आणि त्यांचे सैन्य होते. त्याखालोखाल कारागिर आणि सर्वात खालच्या स्थानावर क्षुद्र अस्पृश्य लोक होते. गांधी अस्पृश्य वर्गाला *ईश्वराची मुले* म्हणत. त्यांची मुक्तता, हेदेखील गांधी यांचे ध्येय होते.








गांधी यांनी भारताला ब्रिटिश दडपशाहीतून मुक्त करण्याचेही व्रत घेतले होते. सुमारे तीनशे वर्षे, काही हजार ब्रिटिश लोकांनी या देशातील तीस कोटी लोकांवर राज्य केले. गांधींनी भारतातील लोकांना अहिंसा व सत्याग्रहाचा मार्ग अनुसरण्याची विनंती केली. मग लोकांनी ब्रिटिश सरकारशी असहकार पुकारला. कित्येक लोकांना ब्रिटिशांनी तुरुंगात डांबले. अनेक लोक स्वतः चरख्यावर सूत कातून स्वतःसाठी कापड विणू लागले. त्यामुळे ब्रिटनमधील मिलमध्ये बनणारे कापड वापरण्याची गरज उरली नाही. लाखो लोकांनी पांढरे खादीचे कपडे वापरायला सुरुवात केली. खादी हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे प्रतिक बनले.

लोकांच्या असहकार चळवळीमुळे ब्रिटिश सरकार क्रुद्ध झाले. 1919 साली, अमृतसरच्या जालियनवाला बाग हत्याकांडामध्ये ब्रिटिश सैन्याने 379 निष्पाप लोकांचे बळी घेतले. यात हजारांपेक्षा जास्त लोक जखमी झाले.








या घटनेनंतर, गांधींनी राष्ट्रव्यापी बंद पुकारला. संपूर्ण भारतभरातील व्यवहार ठप्प झाले. गांधींच्या नेतृत्वाखाली अहिंसक सत्याग्रह चळवळीने जोर पकडला. गांधी यांच्या शब्दांतः “अहिंसा सतत आपले काम करत असते. शांतपणे! अथकपणे! जोवर आजारी समाजाचे रुपांतर निरोगी समाजात होत नाही तोवर.”






1922 साली ब्रिटिश सत्तेने अहिंसा चळवळीचा प्रसार करणे, सरकारविरोधी कारवाया करणे आणि सरकारविरोधात लिखाण करणे या आरोपांखाली गांधी यांना अटक केली. ते दोन वर्षे तुरुंगात होते. पण त्याचा सत्याग्रह चळवळीवर काही परिणाम झाला नाही.



भारतात ब्रिटिश साम्राज्यवादाला कडवे आव्हान निर्माण झाल्यामुळे गांधी खुश होते. तुरुंगात राहाणे त्यांना अभिमानास्पद वाटू लागले. तेथील अडचणी त्यांनी आनंदाने स्वीकारल्या. त्यांच्या मते, यामुळे एखाद्या उच्च आदर्शासाठी सारे काही धैर्याने सहन करायचे असते, अशी शिकवण लोकांना मिळेल आणि प्रत्येक नागरीक स्वतंत्र होईल.

भारतासारख्या उष्ण कटिबंधीय देशात मीठ हे स्वयंपाकघराचे अविभाज्य अंग असते. पण ब्रिटिश सरकारने एक कायदा केला. त्यानुसार, त्यांनी भारतीय लोकांना आपल्याच देशात मीठ बनवण्यास मनाई केली. यामुळे भारतीय लोकांना ब्रिटनमधून आयात केलेले मीठ वापरण्याव्यतिरिक्त काही पर्याय राहिला नाही.








1930 साली गांधींनी मीठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व केले. 78 लोकांसोबत गांधीं साबरमतीवरून समुद्रकिनाऱ्यापासून 200 मैल दूर असलेल्या दांडीपर्यंत पायी चालत गेले. वाटेत आणखी हजारो लोक त्यांच्या या पदयात्रेत सहभागी झाले. गांधी दांडी येथे पोहोचले आणि ब्रिटिश राज्याचा प्रतिकात्मक रितीने विरोध करण्यासाठी त्यांनी चिमूटभर मीठ उचलले. या चळवळीनंतर, आपली भारतावरील सत्तेची पकड कमकुवत होत चालली आहे, हे ब्रिटिश सरकारच्या लक्षात आले.

मीठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व आणि आणखी काही चळवळींनंतर गांधींना वाटू लागले की भारतीय लोकांवर असलेली साम्राज्यवादी ब्रिटिशांची पकड ढिली पडू लागली आहे. यानंतर लोकांमध्ये एक प्रकारचा उत्साह संचारला. गांधींचे अनुयायी त्यांना *महात्मा* (महान आत्मा) म्हणू लागले.

पण ब्रिटिशांनी आपली सत्ता सहजासहजी सोडली नाही. दांडी यात्रेनंतर गांधींना अटक झाली. ब्रिटिशांवर दबाव टाकण्यासाठी गांधींनी तुरुंगात उपोषण सुरु केले. ब्रिटिश सरकारला नमवण्यासाठी हे अतिशय प्रभावी आणि अहिंसक अस्त्र होते. ब्रिटिश सरकार गांधींच्या मृत्युची जबाबदारी घेण्यास तयार नव्हते. त्यामुळे सहा दिवसांनी त्यांनी अस्पृश्य वर्गाच्या नागरी हक्कांचे संरक्षण करणाऱ्या करारास मान्यता दिली. शांततापूर्ण मार्गाने अशा प्रकारचा सामाजिक बदल घडवून आणणे, हा गांधींसाठी मोठा विजय होता.





1944 साली गांधींची पत्नी, कस्तुरबा यांचे निधन झाले. त्यांनी आयुष्यभर आपल्या पतीला खंबीर पाठिंबा दिला. त्या गांधी यांच्या आयुष्याचा अभिन्न हिस्सा होत्या. गांधींना त्यांच्या निधनाचे अतीव दुःख झाले.



दुसऱ्या महायुद्धाच्या काळात, हिंदू आणि मुस्लिम धर्मीयांमध्ये धर्म आणि संस्कृती या मुद्द्यावरून तेढ निर्माण झाली. देशभरात हिंसेचा उद्रेक झाला. धर्माच्या नावावर लोक एकमेकांचा जीव घेऊ लागले. अशा अनागोंदीत गांधी अनवाणी चालत उध्वस्त झालेल्या दूरदूरच्या गावांमध्ये अहिंसेचा संदेश घेऊन गेले.









15 ऑगस्ट 1947 रोजी भारत ब्रिटिशांच्या सत्तेपासून स्वतंत्र झाला. पण धर्माच्या आधारावर देशाचे दोन तुकडे झाले. हिंदू बहुसंख्य असलेल्या भारत देशाचे पहिले प्रधानमंत्री बनले जवाहरलाल नेहरू आणि मुस्लिम बहुसंख्य असलेल्या पाकिस्तान देशाचे अध्यक्ष बनले मुहम्मद अली जिना.

गांधींनी भारताचे स्वातंत्र्य साजरे केले नाही. त्यांनी उपोषण केले. हिंदू आणि मुस्लिम यांनी संयम दाखवावा, समजूतदारपणे वागावे, क्षमाशील असावे, द्वेषावर प्रेमानेच मात करावी अशी त्यांची इच्छा होती.









सत्याग्रह चळवळी करून भारताने इंग्रजांना हा देश सोडून जाण्यास भाग पाडले. सत्याग्रहाचे हेच हत्यार लोकांमधील दुही मिटवून ऐक्य साधेल, असे गांधींना वाटत होते. दुर्दैवाने असा मिलाप प्रत्यक्षात होऊ शकला नाही.

उपोषणामुळे 78 वर्षांचे गांधी मृत्यूच्या अगदी दारात पोहोचले. ते अत्यंत कमजोर झाले. पण त्यांनी आपल्या अनुयायांशी संवाद सुरूच ठेवला.

गांधींनी सर्वधर्मीय लोकांमध्ये बंधुभाव असावा, अशी शिकवण दिली. आपलाच धर्म श्रेष्ठ, असे मानणाऱ्या कट्टरपंथी लोकांनी गांधींचा नेहमीच तिरस्कार केला.






30 जानेवारी 1930 रोजी गांधी एका प्रार्थना सभेत गेले. तिथे हजारो लोक त्यांची वाट पाहात थांबले होते. *नथुराम गोडसे* नावाच्या एका हिंदू व्यक्तिने गांधींच्या छातीवर बंदुकीने गोळी झाडली. गांधी खाली कोसळले. त्यांचे अखेरचे शब्द होते "राम, राम, राम" (मी तुला क्षमा करतो, तुझ्यावर प्रेम करतो, तुला आशीर्वाद देतो).

महात्मा गांधींवर नवी दिल्ली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. भारतातील तसेच जगभरातील लाखो लोकांनी या शांतीदूताच्या निधनावर शोक व्यक्त केला.





मृत्यूसमयी गांधींकडे फारच कमी वस्तू होत्याः दोन चमचे, दोन भांडी, तीन माकडे, तीन पुस्तके, एक खिशातील घड्याळ, एक चष्मा, एक टीनचा पेला (हा त्यांना तुरुंगात भेट मिळाला होता), एक बैठे टेबल, दोन चपला आणि खादीचे कपडे.

कुटुंबियांनी गांधींच्या पार्थिव राखेत गुलाबांच्या पाकळ्या मिसळून ती गंगा, यमुना, सरस्वती या नद्यांच्या त्रिवेणी संगमावर विसर्जित केली.

गांधींची निढळ श्रद्धा असलेल्या भगवद्गीता ग्रंथात लिहिले आहे की "प्रेमपूर्ण परमात्म्याशी मीलन हीच आत्म्याची सर्वोच्च स्थिती आहे. यामुळे मृत्युनंतरही व्यक्ती अमर होते." मानवतेविषयी वाटणारे प्रेम गांधींना आयुष्यभर मार्गदर्शन करत राहिले. त्यांनी लाखो लोकांच्या जीवनात बदल घडवून आणला आणि ते स्वतः अमरत्व स्थितीला पोहोचले.

लेखिकेचे मनोगत

आपल्या आयुष्यात सतत बदल घडवण्याइतकी लवचिकता अंगी असल्यामुळे महात्मा गांधी हे या पृथ्वीवरील सर्वात अलौकिक व्यक्ती ठरले. एका छोट्याशा, बुजऱ्या आणि भित्र्या मुलातून ते एक महान, नीतिमान आणि उदार माणूस बनले. आयुष्यभर ते स्वतःशी प्रामाणिक राहिले. त्यांनी दुसऱ्यांची नक्कल कधीच केली नाही. स्वतःशी प्रामाणिक राहाणे, ही सोपी गोष्ट नाही. गांधी आपले आयुष्य स्वतःच्या अटींवर जगले. त्यात ते यशस्वीही झाले. त्यांचे आयुष्य अध्यात्मिक जाणीव, प्रेम आणि शांती यांनी परिपूर्ण होते.

गांधी हे एक महान देशभक्त आणि अध्यात्मिक नेता होते. त्यांना लोकांनी *राष्ट्रपिता* मानले. अध्यात्मिक श्रद्धा त्यांना जैन धर्मातून मिळाली. जैन धर्मानुसार, मनुष्याचा आत्मा प्रार्थना, नियम, प्रामाणिकपणा आणि अहिंसा यांचा अभ्यास करून शुद्ध होतो. *झाडू* हे जैन धर्माचे प्रतीक आहे. कारण झाडूने जमिनीवरील मुंग्या आणि किडे दूर सारता येतात, ज्यामुळे ते पायाखाली चिरडले जात नाहीत.

गांधींचे सर्वात प्रिय पुस्तक होते भगवद्गीता. हिंदू धर्मीयांच्या या पवित्र ग्रंथात भगवान श्रीकृष्णांनी समता, स्वतःमध्ये बदल आणि भौतिक वस्तुंविषयी निर्मोह हा संदेश दिला आहे. गांधींना इंग्रजीतील लिओ टॉलस्टॉय यांचे *द किंग्डम ऑफ गॉड इज विदिन यू*, हेन्री डेव्हिड थोरो यांचे *ऑन द ड्युटी ऑफ सिव्हिल डिसऔबिडिअन्स* आणि जॉन रस्कीन यांचे *अनटू द लास्ट* ही पुस्तके प्रिय होती. तीन पुस्तकांनी गांधींना आयुष्यभर साथ केली – भगवद्गीता, कुराण आणि बायबल.

गांधी अहिसक चळवळी आणि बहिष्कार या गोष्टींसाठी प्रसिद्ध आहेत. ते आपले आत्मचरित्र *द स्टोरी ऑफ माय एक्सपरिमेंट्स विथ ट्रुथ* यात लिहितात "कायदेभंग करायचा असेल तर माणूस आधी प्रामाणिक, आदरणीय, संयमी आणि विनयी असला पाहिजे. त्याच्यात इतरांविषयी तिरस्काराची भावना नसावी." गांधी युद्ध विरोधी होते. त्यांच्या मते, "शूर तोच असतो जो क्षमाशील असतो. नायक तोच असतो जो तिरस्कार करणाऱ्यावरही प्रेम करतो."

जगभरातील लोक आणि नेते गांधी यांचा आदर आणि सन्मान करतात. गांधी यांच्या हत्येनंतर बुद्धिमान भौतिकशास्त्रज्ञ *अल्बर्ट आईनस्टाईन* म्हणाले: "भविष्यातील पिढ्या कदाचित विश्वास ठेवू शकणार नाहीत की हाडामांसानी बनलेला असा माणूस पृथ्वीवर जन्मला होता."

मला खूप आशा आहे की आपण सर्व गांधी यांच्या सन्मानार्थ एक प्रामाणिक, शांतीपूर्ण आणि प्रेमभावनेने भरलेले जीवन जगण्याचा प्रयत्न करू.

डेमी



